पाच लाख सातबारा उताऱ्यांवर वारस नोंदी

बावीस लाख उतारे अद्ययावत करण्याचे उद्दिष्ट

मुंबई । प्रतिनिधी

महसूल विभागाच्या 'जिवंत सातबारा' मोहिमेमुळे शेतकऱ्यांसाठी जमिनीच्या मालकी हक्कांच्या नोंदी सुलभ करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आतापर्यंत राज्यातील पाच लाखांहून अधिक सातबारा उताऱ्यांवर वारसांच्या नोंदी पूर्ण झाल्या आहेत. विशेष म्हणजे, वारस नोंदी अद्ययावत करण्याचा महसूल विभागातील हा आजवरचा विक्रम आहे.

२२ लाख उतारे अद्ययावत करण्याचे उद्दिष्ट महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निश्चित केले आहे. अनावश्यक आणि कालबाह्य नोंदी हटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. महसूल विभागाने या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याला, महाराष्ट्र दिनापासून सुरुवात केली असून, यामुळे सातबारा उतारा अधिक सुटसुटीत आणि पारदर्शक होत आहे.

या मोहिमेत मृत खातेदारांची नावे काढून कायदेशीर वारसांची नोंद केली जात आहे. राज्यातील ४५ हजार गावांत प्रत्येक गावात किमान ५० उताऱ्यांवर नोंदी होणार आहेत. ई-फेरफार प्रणालीने तलाठी आणि मंडळ अधिकारी हे काम करीत आहेत. यासोबतच 'अपाक शेरा', 'एकुम नोंद', 'तगाई कर्ज', 'भूसुधार कर्ज', 'पोकळीस्त' यासारख्या कालबाह्य नोंदी हटवल्या जात आहेत. भूसंपादन निवाडा, बिनशेती आदेश, पोटखराब क्षेत्राचे रूपांतर, स्मशानभूमी नोंदीही अद्ययावत होत आहेत.

जमिनी खरेदी-विक्री, कर्ज, भूसुधार मोबदला यांसारख्या प्रक्रियांत शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी कमी होणार आहेत. मालकी हक्कांचे वाद कमी होऊन शासकीय योजनांसाठी अचूक आकडेवारी उपलब्ध होईल. शेतकऱ्यांना न्यायालयात खेटे घालण्यापासून मुक्ती मिळावी यासाठी ही मोहीम निर्धाराने राबवत आहोत.

– चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री

बुलढाणा आणि अकोला येथील यशस्वी प्रयोगानंतर ही मोहीम राज्यभर राबवली जात आहे. शेतकऱ्यांना मृत्यू प्रमाणपत्र, आधार कार्ड, वारस प्रमाणपत्र सादर करावे लागतील. अद्ययावत उतारे भूलेख पोर्टलवरून डाउनलोड करता येतील. डिजिटल तंत्रज्ञानामुळे ही प्रक्रिया सुलभ झाली आहे. ही मोहीम शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

सरसंघचालकांचे नाशकात आगमन

संघ शिक्षा वर्गाला आज करणार मार्गदर्शन; उद्योजक, शेतकरी, विद्यार्थ्यांचा सहभाग

नाशिक । प्रतिनिधी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांचे रविवारी (दि.१८) नाशिक मध्ये आगमन झाले आहे.

नाशिक येथे भोसला सैनिक विद्यालयाच्या परिसरात दि.११ मेपासून सुरु असलेल्या संघ शिक्षावर्गाला ते आज मार्गदर्शन करणार आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम क्षेत्राचा 'कार्यकर्ता विकास वर्ग- प्रथम' (सामान्य) १८ ते ४० वर्ष या वयोगटातील तरुण स्वयंसेवकांचा प्रशिक्षण वर्ग रविवारपासून (दि. ११) पासून सुरू झाला आहे. या वर्गात शिक्षार्थींना मार्गदर्शन करण्यासाठी सरसंघचालक नाशिकमध्ये येत आहेत. त्यांचे रविवारी (दि.१८) दुपारी ४.३० च्या सुमारास शिर्डी विमानतळावर आगमन झाले. शिर्डीत साईमंदिरात दर्शन घेऊन ते ५.३० वाजता नाशिककडे रवाना झाले. सायंकाळी ६.३० च्या दरम्यान सरसंघचालकांचे भोसला सैनिकी विद्यालयात आगमन झाले.

पुढील तीन दिवस ते वर्गस्थानी मुक्कामी असणार आहेत. या तीन दिवसांत ते शिक्षार्थींना मार्गदर्शन करतील. २१ मे रोजी सायंकाळी ६ वाजता ते पुढील प्रवासासाठी मार्गस्थ होतील. यादरम्यान त्यांचे कोणतेही जाहीर कार्यक्रम नसल्याचे संघाकडून कळविण्यात आले आहे.

येत्या १ जूनपर्यंत चालणाऱ्या या संघाच्या या वर्गात महाराष्ट्र, गोवा आणि गुजरात या तीन राज्यातून म्हणजे संघ रचनेतील विदर्भ, देवगिरी, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, गुजरात आणि सौराष्ट्र अशा सहा प्रांतातील २८० स्वयंसेवक सहभागी झालेले आहेत. यात शेतकरी, लघुउद्योजक, डॉक्टर्स, वकील, व्यापारी, शिक्षक आदिंसह उच्च महविद्यालयीन विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

या वर्गात सहसरकार्यवाह कृष्णगोपालजी, अ. भा. कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी हेही मार्गदर्शन करणार आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नियमित प्रशिक्षणाचा भाग असलेले असे संघ शिक्षा वर्ग दरवर्षी मे महिन्यात भारतभर सर्वत्र होत असतात.

आजचे कार्यक्रम

❋ स्व. डॉ. दौलतराव आहेर स्मृती व्याख्यान
वक्ते :- आनंदसागर शिराळकर, जपान
विषय :- युगात भाषेचे भविष्य : आपण तंत्रज्ञानाला शिकवणार की तंत्रज्ञान आपल्याला?

❋ स्वरांजली स्टुडिओ प्रस्तुत – गाणं मनामनातलं – हर्षद शिंत्रे, मिलिंद खाडे व सहकारी

तीन हजार रक्त पिशव्या संकलित

नवीन नाशिक । प्रतिनिधी

राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित केले होते. भाजप कामगार मोर्चा, नाशिक जिल्हातर्फे तीन दिवसांत तीन हजारहून अधिक रक्त पिशव्या संकलित करण्यात आल्या.

कार्यक्रम समारोपप्रसंगी भाजप प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, मंत्री महाजन यांचे विशेष कार्यकारी अधिकारी संदीप जाधव, यु.के. मेट्रसचे संचालक राजेंद्र कातोरे, भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. तुषार जगताप, उत्तर महाराष्ट्र सरचिटणीस व्यंकटेश मोरे, शहराध्यक्ष हेमंत नेहेते, मंडल अध्यक्ष राहुल गणोरे, उद्योजक संदीप खिवंसरा, जनरल मॅनेजर अविनाश मांडलेकर, संजय वाणी आदी मान्यवर उपस्थित होते. या अभियानाचे नियोजन व प्रभावी अंमलबजावणी भाजप कामगार मोर्चा जिल्हाध्यक्ष राहुल आरोटे यांनी केली.

औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांचा प्रश्न गंभीर

उद्योजकांना मनपा-एमआयडीसी वादाचा फटका; कामे रखडलेलीच

सातपूर । प्रतिनिधी

औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. महापालिका आणि एमआयडीसी यांच्यात गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या सीमारेषा व साईडपट्टी हस्तांतराच्या वादामुळे रस्त्यांचे ना सक्षमीकरण होत आहे, ना विस्तारीकरण. परिणामी दर पावसाळ्यात उद्योजकांना आणि कामगारांना गंभीर समस्यांचा सामना करावा लागत असल्याने उद्योजकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

शहर परिसरात वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. उद्योग क्षेत्रातही त्याचा परिणाम दिसून येत आहे. औद्योगिक क्षेत्रातील मागील ३०-४० वर्षांपासून रस्त्यांचे कोणतेही ठोस विस्तारीकरण झालेले नाही. आयमाकडून वारंवार कॉंक्रिट रस्त्यांची मागणी करण्यात आली असली तरी मनपाच्या पातळीवर कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. केवळ पॅचवर्क आणि तात्पुरते डागडुजीचे उपाय केल्याने पावसाळ्यात रस्त्यांची दुरवस्था उघड पडते.

एमआयडीसी अथवा मनपा या दोनही संस्थांपैकी कोणीही नैसर्गिक नाले पुनरुज्जीवित करणे, रस्त्यांचे वाइडिंग करणे व वाहतूक सुलभ करण्यासाठी साईडपट्ट्यांचे स्पष्ट हस्तांतरण करणे या गोष्टी तातडीने करणे आवश्यक आहे. त्यासोबतच औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक होत असते. त्यामुळे हे सर्व रस्ते सक्षमीकरण करुन कॉंक्रिटीकरण करण्यात यावेत. अन्यथा दर पावसाळ्यात औद्योगिक क्षेत्र वाहनांच्या कोंडीत आणि पाण्याच्या तळ्यात अडकलेले दिसेल.

-कुंदन डरंगे, आयमा पायाभूत सुविधा उपसमिती अध्यक्ष

विशेषतः लियर कंपनीपासून फ्रें डशिप बेकरी रस्ता, डी ब्लॉकमधील रस्ते, किर्लोस्कर ते एमएमएस कंपनी दरम्याचा मुख्य मार्ग, एफ ब्लॉकमधील शलाका उद्योगसमोरल चौफुली, नामको बँकेच्या मागील रस्ते डब्ल्यू सेक्टरचे रस्ते अत्यंत खराब अवस्थेत आहेत. अनेक ठिकाणी नाल्याचे पाणी रस्त्याखालून जाण्याऐवजी थेट रस्त्यावरुन वाहत असल्याने रस्त्यांची आणखी वाताहत होत आहे. गॅस पाईपलाइनच्या कामांनंतर फोडलेले रस्ते दुरुस्तीची कामे अद्यापही रखडलेली आहेत.

याशिवाय, वेअरहाऊस समोरचा नाला लगतची खासगी प्लॉट्स विक्रीमुळे लुप्त होत असून, पावसात अचानक पाणी वाढल्यास या परिसरासह पुढील उद्योगांना मोठ्या नुकसानीचा धोका निर्माण होणार आहे. पाण्याच्या निचऱ्याची कोणतीही व्यवस्था न करता प्लॉट विक्री करणे म्हणजे एमआयडीसीचा सरळ व्यवसायच थाटल्याचा सवाल उद्योजकांनी उपस्थित केला आहे.

बदला नव्हे, न्याय...

भारतीय सैन्याकडून नवा व्हिडिओ जारी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवून दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. १०० हून अधिक दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. भारतीय सैन्याने पाकिस्तानला कसे चोख प्रत्युत्तर दिले, त्याचा ताजा व्हिडिओ भारतीय सैन्याच्या वेस्टर्न कमांडच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करण्यात आला आहे. त्यात भारतीय सैन्याने जम्मू सेक्टरच्या समोरील पाकिस्तानी चौक्या आणि टॉवर उद्ध्वस्त केल्याचे दिसून येते आहे.

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यापासून हे सर्व सुरू झाले. तो राग नव्हे ज्वालामुखी होता, असे व्हीडिओत एका लष्करी जवानाने म्हटले आहे. माझ्या मनात फक्त एकच गोष्ट होती की, यावेळी आम्ही असे उत्तर देऊ की, त्यांच्या येणाऱ्या कैक पिढ्या ते लक्षात ठेवतील. हा सूड नव्हे तर न्याय होता, असे आणखी एका जवानाने म्हटले आहे.

नाणेनिधीच्या पाकिस्तानवर अकरा नव्या अटी

इस्लामाबाद । वृत्तसंस्था

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) पाकिस्तानवर त्यांच्या बेलआउट कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यासाठी ११ नव्या अटी लादल्या आहेत. भारतासोबतच्या तणावामुळे योजनेच्या आर्थिक, बाह्य आणि सुधारणा उद्दिष्टांना धोका वाढू शकतो, असा इशाराही पाकिस्तानला दिला आहे.

पाकिस्तानवर लादलेल्या नव्या अटींत १७.६ ट्रिलियन रुपयांच्या नवीन बजेटची संसदीय मान्यता, वीज बिलांवरील कर्ज सेवा अधिभारात वाढ आणि तीन वर्षांपेक्षा जास्त जुन्या वापरलेल्या गाड्यांच्या आयातीवरील निर्बंध उठवणे यांचा समावेश आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील वाढता तणाव कायम राहिला अथवा आणखी वाढला तर कार्यक्रमाच्या आर्थिक, बाह्य आणि सुधारणा उद्दिष्टांना धोका वाढू शकतो, असे 'आयएमएफ'ने प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटले आहे.

पुणे विद्यार्थीगृहाने जपली सामाजिक बांधिलकी

शताब्दी महोत्सवाप्रसंगी प्रा. श्रीधर पाटणकर यांचे प्रतिपादन

पंचवटी । प्रतिनिधी

पुणे विद्यार्थी गृह संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणाची आवड असणाऱ्या गरीब, होतकरू, अनाथ मुलांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचे प्रेरणादायी काम केले आहे. असे प्रतिपादन नियामक मंडळाचे उपाध्यक्ष माजी प्राचार्य श्रीधर पाटणकर यांनी केले.

पुणे विद्यार्थीगृह पंचवटीतील नाशिक शाखेने ९९ वर्षे पूर्ण केले असून शतकमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. यानिमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमाप्रसंगी मार्गदर्शन करताना पाटणकर बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे होते. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेच्या देणगीदार सिंधूताई धामणकर उपकार्याध्यक्ष सुभाष जिर्गे, कार्यवाह संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष कृष्णाजी कुलकर्णी, कुलसचिव दिनेश मिसाळ, संचालक आनंद कुलकर्णी, सुनील रेडेकर, राजेंद्र कडूसकर, रमेश कुलकर्णी उपस्थित होते.

शतक महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने याच प्रांगणात बांधण्यात आलेल्या इंग्रजी माध्यमाच्या नूतन शालेय इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्था कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे यांनी संस्थेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या ११६ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा तसेच भविष्यात विद्यार्थ्यांच्या दृष्टीने करावयाचे विविध उपक्रम याबाबत माहिती दिली. स्वागत व प्रास्ताविक संस्थेचे उपकार्याध्यक्ष तथा पंचवटी नाशिक शाखेचे संचालक अमोल जोशी यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सुभाष जिर्गे यांनी करून दिला तर सत्काराचे निवेदन शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्रा. दिलीप अहिरे यांनी केले. यावेळी कैलास मठातील सुमारे शंभर विद्यार्थ्यांनी रामरक्षा पठण केले. याप्रसंगी नूतन शाळेचे आर्किटेक्ट, कॉन्ट्रॅक्टर,पेंटर, इलेक्ट्रिक व इंजिनियर आदी सर्वांचा सत्कार करण्यात आला. माजी कार्याध्यक्ष कृष्णाजी शिरकांडे, प्रभाकर कुलकर्णी, विद्यार्थी माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष डॉ. एकनाथ कुलकर्णी, सल्लागार समितीचे सदस्य डॉ. शांताराम रायते, मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, माजी विद्यार्थी आ. जयंत जाधव, शिक्षणाधिकारी प्रवीण पाटील, उपशिक्षणाधिकारी उदय देवरे, काका वाघ शिक्षण संस्थेचे अजिंक्य वाघ, राज्याचे एसएससी बोर्डाचे अध्यक्ष सुभाष बोरसे,विभागीय सहसचिव मच्छिंद्र कदम, विस्तार अधिकारी विस्तार अधिकारी कैलास सांगळे, माजी नगरसेवक उल्हास धनवटे, यांच्यासह संस्थेचे देणगीदार, हितचिंतक, माजी विद्यार्थी संस्थेच्या सर्व विभागांचे प्रमुख, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

करिअर मार्गदर्शन कार्यशाळेला प्रतिसाद

नाशिक । येथील अस्बी फाउंडेशनच्या वतीने वडाळारोड येथील एका लॉन्समध्ये दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष माजिद पठाण यांनी प्रस्तावना केली. फैजल काझी व मोईज शेख यांच्या सहकार्याने कार्यक्रम झाले. करिअर कांउसलर व मोटिवेशनल स्पिकर आसिफ शेख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी करिअरच्या विविध संधी, शैक्षणिक कोर्सेसची योग्य निवड कशी करावी, शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन आर्थिक अडचणींवर मात करत उच्च शिक्षण कसे घ्यावे, सरकारी योजना, परदेशी शिक्षणाच्या वाटा आदी विषयांवर सखोल व उपयुक्त माहिती दिली. यावेळी निवृत्त आर्मी अधिकारी सुभेदार सलीम पठाण यांनीही युवकांना भारतीय सेनेत येण्यासाठी प्रोत्साहित केले व वेळ प्रसंगी भारत देशासाठी आपले सर्वस्व अर्पण करण्याची तयारी ठेवावी असे सांगितले. नाईक सुभेदार जाकिर पठाण यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खतीबे शहर हिसामुद्दिन खतीब होते तर प्रमुख पाहुण म्हणून शहरे काजी एजाज काझी, अॅड. एम. टि. क्यु. सय्यद, अॅड. नाजीम काजी, कारी जहुर अशरफी, हसन मुजावर, तनवीर तांबोली आदी उपस्थित होते. यावेळी दहावी व बारावीच्या परीक्षेत विशेष यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौर करण्यात आला. कार्यकर्मांच्या यशस्वीतेसाठी मुदस्सर काजी, मोबीन मेमन, मुजाहिद सय्यद, जमीर शेख, अॅड. वसीम खान, जोहेब कुरेशी, तय्यब कुरेशी, अश्पाक शेख, मतीन पठाण आदींनी परिश्रम घेतले.

जागतिक संग्रहालय दिन उत्साहात

नाशिक । दरवर्षी १८ मे रोजी जागतिक संग्रहालय दिन साजरा करण्यात येतो. यानिमित्त महाराष्ट्र राज्य पुरातत्त्वच्या प्रादेशिक वस्तुसंग्रहालय नाशिक येथे सर्वांसाठी संग्रहालयात चित्रकला, माहिती उपक्रम राबविण्यात आला. या प्रसंगी घारपुरे घाट येथील आधाराश्रमच्या मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या मुलींनी महापुरुषांची तसेच प्राचीन वस्तूंची चित्रे काढली. या प्रसंगी राज्य पुरातत्त्व नाशिक विभागाचे अभिरक्षक अमोल गोट्टे, शरद चौधरी, मैत्रेयी भोसेकर, नागेश्वर करवदे, दीपिका पोळ, रोहन फगारे, सोमनाथ गोराडे उपस्थित होते. आधारश्रमाच्या शिक्षिका प्रेमलता गोसावी, स्वाती उल्हाळे, मंदाताई यांनी सहकार्य केले.

पान १ वरुन..

आगीत अख्खे कुटुंब मृत्युमुखी

मृतदेह हाती लागले. सुरुवातीला हे पाच जण बेशुद्ध असावेत, असा अंदाज लावला गेला. मात्र, आगीत त्यांनीही जीव सोडल्याचे रुग्णालयातील डॉक्टरांनी सांगितले. आगीत मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये सेंट्रल इंडस्ट्रीचे मालक उस्मान मंसूरी (वय ८७), अनस मंसूरी (वय २४), शीफा मंसूरी (वय २२), युसुफ मंसूरी (वय १ वर्ष), आयेशा बागवान (वय ३८), मेहताब बागवान (वय ५१), हिना बागवान (वय ३५), सलमान बागवान (वय ३८) यांचा समावेश आहे.

नव्या महाविद्यालयांना मान्यता नाही

१०, अहिल्यानगर जिल्ह्यातील ९, नागपूरमधील ८, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्रत्येकी ६ आणि शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे जिल्ह्यातील ५ महाविद्यालयांचा समावेश आहे. या महाविद्यालयात एकाही विद्यार्थ्याने प्रवेश घेतला नसल्याचे आढळून आले. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनी आगामी शैक्षणिक वर्षात पदवीच्या कला, वाणिज्य, विज्ञान आणि विधी महाविद्यालयांना परवानगी न देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

शंभराहून कमी विद्यार्थीसंख्येची महाविद्यालये

अहिल्यानगर: १२, अकोला: १५, अमरावती २९ , बीड : १६, भंडारा: १९, बुलढाणा : २४, चंद्रपूर : ३०, छत्रपती संभाजीनगर : १९, धाराशिव : ११, धुळे : ०७, गडचिरोली : १८, गोंदिया : १६, हिंगोली : ०५, जळगाव : १५, जालना : २८, कोल्हापूर : १५, लातूर : १३, मुंबई: ९, मुंबई उपनगर : १५, नागपूर : ५७, नांदेड: ११, नंदुरबार : १, नाशिक : १४, पालघर : ०७, परभणी: १४, पुणे : २७, रायगड: ११, रत्नागिरी : ०९, सांगली : ०२, सातारा : ०१, सिंधुदुर्ग : १०, सोलापूर : १४, ठाणे : ३२, वर्धा : १६, वाशिम : १० , यवतमाळ : २७. एकूण : १६९. ही आकडेवारी सन २०२२- २३ या शैक्षणिक वर्षातील आहे.

कैद्यांसोबत पोलिसांची हॉटेलमध्ये 'पार्टी'

सुरू असलेल्या या चौकशीनंतर रविवारी (दि. १८) सकाळपासून पोलीस दलात खळबळ उडाली. याप्रकरणी पोलीस आयुक्तांनी गंभीर दखल घेतली असून, उद्या सोमवारी (दि. १९) कारवाईसह चौकशीचा संपूर्ण अहवाल सादर होणार आहे.

चोरीछुपी 'अर्थकारण'

पोलीस मुख्यालयातून ठराविक अंमलदारांनाच 'कैदी पार्टी' साठी नेमण्यात येते. वारंवार संबंधित कर्तव्यावर नेमण्यासाठी तेथील हजेरीमास्तरांसह काही वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत अंमलदारांमार्फत झमलईफदेण्यात येते. कारण, जितका झ्तादवानफसंशयित असेल तितकाच फायदा झ्कैदी पार्टीफदरम्यान होतो, अशी पोलीस दलात चर्चा आहे. न्यायालयातून निघतांना संशयितांना नातलगांसोबत भेटू देणे, घरचा डबा व इतर वस्तू देणे, न्यायालयीन प्रक्रिया लवकर संपूनही सायंकाळी कारागृहात कैद्यांना हजर करणे, बाहेर हॉटेलात जेवण करु देणे यासाठी कैद्यांसह त्यांच्या नातलगांमार्फत झ्मेवाफदिला जातो, असे कळते. हाच झ्मेवाफसंबंधित कर्तव्यावर नेमणूक करुन घेण्यासाठी हजेरी मास्तरसह संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवला जातो. दीड महिन्यापूर्वी आयुक्तांनी मुख्यालयातील हजेरी मास्तरसह वरिष्ठ निरीक्षकांना 'दणका' दिला होता. मात्र, आता झ्कैदी पार्टीफच्या झोल उघड झाल्याने कठोर कारवाईची शक्यता आहे.

कैदी रुग्णांची झाडाझडती?

जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या आवारात असलेल्या झ्प्रिझन वॉर्डफमध्ये नेमणुकीस असलेले पोलीस अंमलदारही रडारवर येण्याची शक्यता आहे. त्या ठिकाणी उपचार घेणाऱ्या कैद्यांना भेटण्यास येणाऱ्या नातलगांपासून 'भाई-दादा' यांना खूश ठेवण्याचे काम 'प्रिझन वॉर्ड'च्या अंमलदारांमार्फत होत असल्याची ओरड आहे. वारंवार काही बंदिवान, संशयित उपचारार्थ दाखल होत आहेत. त्यात कारागृह प्रशासन, रुग्णालय प्रशासनापासून तेथे नेमणुकीस असलेल्या पोलिसांपर्यंतची 'सेटिंग्ज'असल्याची चर्चा आहे. वरील पथकच नव्हे तर मुख्यालयातील इतर अंमलदारही संशयाच्या फेऱ्यात अडकले आहेत. त्यामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.